**महाराष्ट्र शासन**

क्र. मग्रारो-२०१२/प्र.क्र.३३/मग्रारो-१,
नियोजन (रोहयो) विभाग,
१६ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक : १२मार्च, २०१५

प्रति,

उपायुक्त (रोहयो), जिल्हाधिकारी,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
(सर्व)

**विषय** : महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत अपुर्ण कामे पुर्ण करण्याकरीता ठेवण्यात आलेल्या ५ अपुर्ण कामाच्या अटी बाबत.

**संदर्भ** : शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१२/प्र.क्र.३३/रोहयो-१, दिनांक ०४ जुलै, २०१२ व शासन परिपत्रक क्र. मग्रारो-२०१२/प्र.क्र.३३/रोहयो-१, दिनांक १६ नोव्हेंबर, २०१२

महोदय,

महात्मा गांधी नरेगा अंतर्गत राज्यात मोठ्या प्रमाणात अपुर्ण कामाची संख्या असल्याने केंद्र शासनाने दिनांक २६ एप्रिल, २०१२ च्या पत्रान्वये राज्यातील अपुर्ण कामांच्या स्थिती बाबत असमाधान व्यक्त केले होते. तसेच अपुर्ण कामे पूर्ण करण्याबाबत विशेष मोहिम राबविण्याचे निदेश दिले होते. एमआयएस वरील माहितीनुसार दिनांक १९ जून, २०१२ रोजी राज्यात जवळपास २.५२ लक्ष कामे अपुर्ण होती. त्यामुळे सदर कामे पुर्ण करण्यासाठी अनुसरावयाची कार्यपद्धती उपरोक्त संदर्भीय शासन निर्णय दिनांक ०४ जुलै, २०१२ अन्वये निर्धारित करण्यात आली होती. सदर शासन निर्णयातील परिच्छेद ८ मध्ये अशी तरतूद करण्यात आली होती की, ज्या ग्रामपंचायत क्षेत्रात एका वर्षापेक्षा जास्त कालावधीकरीता ५ पेक्षा जास्त कामे अपुर्ण असल्यास त्या ग्रामपंचायत क्षेत्रात तहसिलदार व गटविकास अधिकारी यांनी जिल्हाधिकारी यांचे पूर्व मान्यतेशिवाय नवीन कामांना प्रशासकीय मान्यता देवू नये.

२. अपुर्ण कामाच्या मजुर क्षमतेपेक्षा जास्त कामाची मागणी मजुरांकडून प्राप्त झाल्यास ५ कामे अपुर्ण असले तरी मागणीच्या पूर्ततेसाठी जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने गटविकास अधिकारी/तहसिलदार नवीन कामांना प्रशासकीय मान्यता देवून अशी कामे सुरू करू शकतात असे स्पष्टीकरण उपरोक्त संदर्भीय शासन परिपत्रक दिनांक १६ नोव्हेंबर, २०१२ अन्वये देण्यात आलेले होते. तसेच ग्रामपंचायतीमध्ये कामे घेत असतांना वर्षभरासाठी प्राप्त कामाच्या मागणीवर आधारित मणुष्यदिवसाची प्रगणना करून तितक्या मर्यादेतील कामांना प्रशासकीय मंजुरी देवून कामे शेल्फवर ठेवावी जेणे करून मागणीपेक्षा दुपटीने मणुष्यदिन निर्मितीची तजवीज होवू शकेल अशाही सुचना सदर परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत. तथापि, नवीन कामे मंजुर करतांना क्षेत्रीय यंत्रणेला संभ्रम होत असल्याचे निदर्शनास येत आहे. सबब खालील प्रमाणे सुधारित सुचना देण्यात येत आहेत.

"एका ग्रामपंचायत क्षेत्रात एका अर्थिक वर्षापेक्षा जास्त कालावधीकरीता ५ पेक्षा जास्त कामे जरी अपुर्ण असली तरी सदर ग्रामपंचायत क्षेत्रात मजुरांच्या कामाची मागणी असल्यास त्या ठिकाणी प्राधान्याने मजुर प्रधान जलसंधारण व जलसंवर्धनाची कामे घेण्यात यावीत व तद्नंतर अशा कामांना जिल्हाधिकारी यांची कार्योत्तर मान्यता घ्यावी."

**आपली,**

**(आर. विमला)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

12/3/2015

C:\egs १\ongoing ५ work २३ ०२ २०१५.docx